# पंचधारा

वर्ष : ६४ अंक दुसरा
एप्रिल ते जून २०२२



मराठी साहित्य परिषद,
तेलंगण राज्य, हैदराबाद

RNI Reg. No. 32307/79

मूल्य : ६०/-

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

**वर्ष ६५ वे, अंक पहिला**
**एप्रिल ते जून २०२२**
**चैत्र-वैशाख-ज्येष्ठ १९४४**

## संपादक मंडळ

**डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)**
**डॉ. शोभा देशमुख**
**डॉ. गीता काटे**
**प्रा. मीना जागीरदार**
**श्रीमती विद्या मक्तल**
**श्री. माधव रामराजे चौसाळकर**

## मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य

इसामिया बाजार, हैदराबाद - ५०० ०२७

RNI Reg. No. 32307/79

***********************************************

# अनुक्रमणिका

***********************************************

संपादकीय ........................................................... ५

१. **नियतकालिकांची संकल्पना आणि स्वरूप**

डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे ........................................................... ७

२. **पानिपत : कादंबरीचे नाटकात आणि कथाशयाचे चित्रपटात माध्यमांतर**

प्रा. विनय मडगावकर ........................................................... १३

३. **आत्मभान जागविणारी कार्यकर्ती लेखिका : पी. ललिथा कुमारी 'व्होल्गा'**

डॉ. विश्वाधार देशमुख ........................................................... २५

४. **'नवकविते'प्रमाणे नव 'गजल'???**

सदानंद डबीर ........................................................... ३२

५. **लोककवी विठ्ठल वाघांच्या कवितेतील जीवनसन्मुखता**

डॉ. प्रज्ञा निनावे ........................................................... ४०

६. **डॉ. अरुणा ढेरे यांच्या कादंबरीतील मिथकसृष्टी ('मैत्रेयी' आणि 'उर्वशी'च्या संदर्भात)**

डॉ. उमेश मारुती सिरसट ........................................................... ५३

**पुस्तक परिचय**

अठरा पुराणांनंतरचे एकोणीसावे पुराण 'पत्नीपुराण' - सतीश बडवे ....... ६८

भटक्या विमुक्ताचा आक्रोश - डॉ. रवीन्द्र बेम्बरे ........................ ७३

नदीष्ट - नंदिनी देशमुख ........................................................... ७८

****************************************

# पानिपत : कादंबरीचे नाटकात आणि कथाशयाचे चित्रपटात माध्यमांतर

प्रा. विनय मडगावकर

****************************************

## प्रास्ताविक :

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठापित केले. ते नष्ट करण्यासाठी मोगल बादशहा औरंगजेबाने अखेरपर्यंत प्रयत्न केले. त्याच्या निधनानंतर मुघलसत्ता मात्र १७४८ पर्यंत दुर्बल झाली. तेव्हा दिल्लीचा वजीर सफदरजंगच्या सल्ल्यावरून शाहआलम द्वितीय याने स्वराज्याचे पेशवे बाळाजी बाजीराव यांना मोगल साम्राज्याच्या रक्षणाची विनंती केली. तत्कालीन राजकीय परिस्थितीला अनुसरून अहमदिया कराराद्वारे पेशवा बाळाजी बाजीराव यांनी ती जबाबदारी स्वीकारली. पेशव्यांनी तिथे नियुक्त केलेल्या दत्ताजी शिंदे यांचा पराभव करून अहमदशाह अब्दालीने भारतात प्रवेश केला होता. 'अब्दालीची नड हिंदुस्थानचे पातशाहीत रूजों देणे हें अयोग्य' या विचाराशी ठाम राहून सदाशिवराव भाऊ मराठ्यांची सशस्त्र सेना घेऊन अब्दालीवर चाल करून गेले. १४ जानेवारी १७६१ रोजी मराठे आणि अफगाणी यांच्यात पानिपत येथे भीषण रणसंग्राम झाला. हा इतिहास बखर, कादंबरी, नाटक या साहित्य प्रकारात आणि चित्रपट-मालिका या माध्यमांमध्ये आविष्कृत झाला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात त्याचे विश्लेषण केले आहे.

## पानिपतचा इतिहास कथन करणारी बखर :

पानिपतची पहिली लढाई २१ एप्रिल १५२६ रोजी इब्राहिम लोदी आणि बाबर यांच्यात झाली होती. बाबरच्या सैन्याने लोदीचा पराभव करून भारतात मोगल साम्राज्याला सुरुवात केली. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर त्याच मोगल साम्राज्याचा शेवट झाला. पानिपतचा इतिहास समजून घेण्याआधी इतिहास ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इतिहास या संकल्पनेची व्यापकता स्पष्ट केली आहे. त्यांच्या मतानुसार "विशिष्ट काळ, विशिष्ट वेळ आणि विशिष्ट व्यक्तीचे आचरण यांचा सांघात झाला असता प्रसंग ही वस्तु बनली जाते.

अशा अनेक प्रसंगाच्या व्यवस्थित संगतीपासून इतिहासाची निर्मिती होते.''[१] ऐतिहासिक व्यक्ती आणि त्यांच्या अनुषंगाने घडलेल्या घटना-प्रसंगांचे वस्तुस्थितीदर्शक असे सरळ साधे कथन म्हणजे इतिहास होय. 'पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, नाना फडणीसांचे आत्मचरित्र' या सर्व बखर वाङ्मयात पानिपतचा विषय कथन करण्यात आला आहे. डॉ. कुसुम कुलकर्णी यांनी बखरींच्या संदर्भात केलेले निवेदन मार्मिक आहे. ''बखर म्हणजे इतिहास नव्हे, हे आता नव्याने सांगण्याची गरज उरलेली नाही. इतिहासाचार्य राजवाडे यांनी इतिहासाचे साधन म्हणूनसुद्धा बखरींना प्रमाण मानलेले नाही.''[२] पानिपत संदर्भात रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी 'पाणिपतची बखर' अव्वल साधनावरून लिहिली गेली म्हणून अव्वल दर्जाची मानली आहे. अभ्यासासाठी या बखरीचे संदर्भ घेतले आहेत.

**पानिपतच्या संग्रामावर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्या :**

'इतिहास' हा ऐतिहासिक कादंबरीचा मुलाधार असतो, डॉ. विभा शहा यांच्या मतानुसार ''ऐतिहासिक कादंबरीकार निर्मितीसाठी पुराव्यांनी सिद्ध झालेल्या ऐतिहासिक घटना आणि व्यक्ती यांचा आधार घेत असला तरी तो त्यांची केवळ नोंदणी करत नसतो, तर त्या आधारे आपल्या कल्पनेच्या साहाय्याने स्वतंत्र कथानकाची निर्मिती करत असतो.''[३] ऐतिहासिक कादंबरीकार प्रतिभवंत असावा, त्याचबरोबर तो इतिहासाचा सजग अभ्यासक असायला हवा. त्याच्या कलात्मकतेमुळे 'इतिहास-शास्त्र' आणि 'साहित्य-कला' या दोहोंचा संयोग ऐतिहासिक कादंबरीत घडून येतो. पानिपतच्या भयंकर संग्रामावर आधारित लिहिलेल्या चार महत्त्वपूर्ण कादंबऱ्या या संदर्भात अभ्यासनीय आहेत. (१) चि. वि. वैद्य लिखित 'दुर्दैवी रंगु', (२) स. शं. देसाईंनी लिहिलेली 'चंबळेच्या खोऱ्यात', (३) ना. बि. बापट यांची 'पानिपतची मोहीम' आणि (४) विश्वास पाटीलांनी साकारलेली 'पानिपत'. यापैकी पहिल्या तीन कादंबऱ्यांचा कथाविषय पानिपत रणसंग्रामाच्या पार्श्वभूमीवरून गोचर होतो; तर विश्वास पाटीलांच्या 'पानिपत' कादंबरीत मकर संक्रांती दिवशी, १४ जानेवारी १६६१ रोजी पानिपतच्या संग्रामाचा समग्र इतिहास वाचकांसमोर सचेतन होऊन साकार होतो.

**'पानिपत' कादंबरीचे 'रणांगण' नाटकांत प्रकारांतर :**

कादंबरी तथा नाट्यसंहिता यांचे वाचन करणारा वाचक एकटाच वाङ्मयीन स्वरूपाच्या आनंदाची अनुभूती घेत असतो, मात्र नाटकाच्या सादरीकरणातून एकाच

वेळी असंख्य रसिक प्रेक्षकांना अभिनय, गीत, संगीत, नृत्य, गायन, चित्रकला-नेपथ्य या विविध कलाश्रृंगारांच्या आविष्कारातून प्राप्त होणारा आनंद अवर्णनीय असतो. नाटक हे दृक्‌श्राव्य माध्यम असल्याने नेत्र-श्रोत्र या ज्ञानेंद्रियांना सुख देणारे आहे. त्यामुळे कादंबरी अथवा नाटकाची संहिता वाचण्यापेक्षा रसिक प्रेक्षक नाट्यप्रयोग पाहण्यास प्राधान्य देतात. हे ओळखून मराठी साहित्यविश्वात ज्या कादंबऱ्यांमध्ये वाङ्मयीन मुल्यांबरोबर नाट्यमूल्यही आहे, त्या कादंबऱ्याचे नाटकांत प्रकारांतर करण्यात आले. 'साहित्यकृतीतील मूळ आशयबीजाचे स्वरूप अबाधित राखून साहित्य-संहितेचे अन्य प्रकारानुरूप केले जाणारे परिवर्तन म्हणजे प्रकारांतर'. या प्रक्रियेत 'कादंबरी' या साहित्य प्रकारातील आशय 'नाटक' या साहित्यप्रकारांत अवस्थांतरित केला जातो. 'पानिपत' ही अशीच कादंबरी जिचे लेखक विश्वास पाटील यांनी स्वतः 'रणांगण' या प्रयोगक्षम नाटकात प्रकारांतर केले आहे.

**'रणांगण' नाटकाचा लक्षवेधी फॉर्म :**

सिद्धहस्त लेखक विश्वास पाटील यांनी 'पानिपत' कादंबरीचे 'रणांगण' नाटकात प्रकारांतर करत असतांना नाटकाचा फॉर्म गवसण्याचे मोठे आव्हान लिलया पेलले. निवडक प्रसंग आणि मोजक्याच पात्रांच्या माध्यमाने सर्जनशील प्रतिभेच्या साहाय्याने त्यांनी 'रणांगण' नाटकाची दर्जेदार संहिता साकार केली. 'पानिपत' कादंबरीतील संग्रामाचा भव्यपट 'राणांगणा'च्या माध्यमाने रंगभूमीवर सादर करण्यात ते यशस्वी ठरले. कादंबरीतील पान-पानभर वर्णनांची जागा नाटकातील ठळक संवाद, सर्वांग सुंदर अभिनय, सूचक देहबोली, हृदयाचा ठाव घेणारे पार्श्वसंगीत, आकर्षक नेपथ्य, लक्षवेधक प्रकाशयोजना, श्रवणीय गीत-संगीत व नृत्याविष्कार या सर्वांनी घेतली. 'पानिपत' कादंबरीत ऐतिहासिक व्यक्तींचे जसे इतिहाससमान्य व्यक्तिचित्रण केले आहे, त्याचप्रमाणे राणांगण नाटकात त्या त्या पात्राची वेशभूषा व रंगभूषाही साजेशी यथायोग्य वाटते. कादंबरीतील व्यक्तीचित्र रेखाटन वाचून वाचकांच्या अंतरमनात जी व्यक्तिरेखा आकार घेते, तशीच ती रंगभूमीवर दिसते. या नाटकांतील सर्व प्रवेशांचे ताण मध्यवर्ती अंतीम महासंग्रामाकडे खेचले जातात. या संहितेतील एकामागून एक प्रवेश रंगभूमीवर साकार होत असतांना उत्कर्षबिंदूकडे हे नाट्य वेगाने प्रवाहित होते. दिग्दर्शक वामन केंद्रे यांच्या सक्षम दिग्दर्शन कौशल्यामुळे 'रणांगण'चा प्रत्येक प्रवेश उत्कंठावर्धक ठरतो. प्रयोगांती उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून ते या यशाचे शिल्पकार ठरतात. असा भव्य दिव्य विषय रंगभूमीवर नाट्यरूपाने सादर करणे हे लेखक, निर्माता, दिग्दर्शक यांच्या समोर मोठे आव्हान होते.

**लक्षवेधी फॉर्म असलेल्या नाटकाचा प्रत्यक्ष रणभूमीवर शुभारंभ :**

'रणांगण'चा प्रथम प्रयोग निर्माता मोहन वाघ यांनी पानिपतच्या रणभूमीवर १० डिसेंबर १९९८ रोजी प्रस्तुत केला. पानिपतच्या महासंग्रामाला अडीचशे वर्षे लोटल्यानंतर 'रणांगण' नाटक रंगभूमीवर सादर झाले. वर्तमानातील प्रेक्षकांसमोर इतिहासाचे सादरीकरण करणाऱ्या नाटकाचा आरंभ वर्तमानात प्रत्यक्ष पानिपतच्या रणांगणावरच झाला. या नाटकाचा फॉर्म लक्षवेधी आहे. 'पानिपतच्या समरांगणावर मरण पावलेल्यांना वर्षातून एकदा मकरसंक्रांतीच्या रात्री मुक्ती प्राप्त होते. या काल्पनिक प्रसंगातून ऐतिहासिक नाटकाला सुरुवात होते.' नाटकाच्या पहिल्या प्रवेशात पानिपतच्या मोहिमेतील मराठ्यांच्या सैन्यातील तोफखान्याचा प्रमुख इब्राहीम गारदीचा आत्मा त्या विराण रणभूमीवर भाऊसाहेबांचा शोध घेत प्रवेश करतो. त्यात अफगाणी सैनिकांबरोबर मराठ्यांचेही आत्मे चीरनिद्रेतून जागृत होतात आणि गतस्मृतींना उजाळा देतात. मराठे सैनिक पानिपताच्या पराभवास भाऊंना जबाबदार ठरवून त्यांचा द्वेष करतात; तर अफगाणी शत्रूसैनिक भाऊसाहेबांच्या पराक्रमाचे गुणगान करतात. या प्रवेशातील हा विरोधाभास प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. गारदी सैनिक वारंवार या नाटकांत मराठी सैनिकांना भाऊसाहेबांच्या धीरोदात्त पराक्रमाबद्दल अभिमानाने सांगतात. त्याबरोबर त्यांना दर्शन घडवतात. जनमानसात 'पानिपत' म्हणजे दारूण पराभव, भयंकर अपयश अशी धारणा होती. 'पानिपत झाले' (पराजय झाला), 'संक्रांत कोसळली' (भयानक संकट कोसळले), 'विश्वास गेला पानिपतात' (अविश्वास व्यक्त करणे) अशा मराठी म्हणींतूनही पराभवाची नाकारात्मक भावना प्रतिबिंबित होते. अडीचशे वर्षे चीरनिद्रेतून जाग आलेले मराठे हीच भावना व्यक्त करतात. तेव्हा अफगाणी सैनिक गीत-संगीत, नृत्यातून इतिहासातील घटनांचा आलेख मराठ्यांसमोर सादर करतात. मराठे सैनिक प्रेक्षक बनतात आणि आपलाच गतजीवनानुभव पुन्हा अनुभवतात. येथूनच चित्ताकर्षक नाट्यकथेला आरंभ होतो.

**पानिपत युद्धाचे महानायक सदाशिवराव भाऊ :**

'पाणिपतच्या बखरीत' बखरकाराने महादजीपंत पुरंदरे याच्या शब्दांतून कार्यक्षम सदाशिवराव भाऊसाहेबांचे शौर्य व निश्चयीपणा हे गुण नेमके टिपले आहेत. "कैलासवासी चिमाजी अप्पा यांणी पूर्वी बहुत पराक्रम केला. त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब हे लढाईत मागे हटणार नाहीत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील."[३] शेवटी तेच घडते. बखरकाराने पानिपतच्या युद्धात भाऊसाहेबांनी गाजवलेल्या पुरुषार्थाचे यथार्थ वर्णन केले आहे. "भाऊसाहेबानी

युद्धात उडी घेतली. तेव्हा (भाऊ) केवळ कल्पांतींचा आदित्य भासला. ग्रीष्म ऋतूच्या दिवसात मेघांचे ढग उठतात आणि विद्युलता चमकून लागलीच नाहींशी होते, त्याप्रमाणे भाऊसाहेबांनी संग्रामांत उडी घातली ते समय सर्वास दिसले. तिकडील खांसा अबदल्ली व मनसूरअल्ली व सुजातदौले इराणीकडील नादिरशाह, तंबूरशाह, वगैरे उरल्या फौजेसहित त्यांणीही उडी घातली. ते समयीं श्रीहरी त्या अमित्राकडील फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत पेशवे बहादूर यांस विन्मुख झाला.''[४]

'पानिपत' कादंबरीत तसेच 'रणांगण' नाटकातही लेखकाने रणझुंजार, करारी सदाशिवराव भाऊसाहेबांची धीरोदात्त प्रतिमा सादर केली आहे. विविध प्रसंगांतून त्यांच्या स्वभावाचे दर्शन कादंबरीत वाचकांना तर नाटकात दर्शकांनाही होते. सदाशिवराव भाऊंचे राजकारण, मुत्सद्दी धोरण, सक्षम नेतृत्व, धर्मप्रेम, राष्ट्रभक्ती, समरांगणावरील शौर्य तसेच युद्धाचे डावपेच यांचे कौशल्य, असे स्वभावगुण या नाट्यात दिसून येतात. संपूर्ण नाटकात उत्कटतेच्या टोकाला नेणारे भाऊसाहेबांचे संघर्षपूर्ण संवाद ऐकून दर्शकांच्या हृदयात वीरश्री संचरते. युद्धाआधी भुकेने व्याकूळ होऊन तडफडणाऱ्या लष्कराला, जनावरांना पाहून त्यांचा हळवेपणाही प्रकट होतो. ज्या वेळी मरणासन्न वीर मराठे मृत्यूशी अंतिम झुंज देण्यास सिद्ध होत होते, त्याच वेळी नऊ वर्षाच्या मुलीशी विवाहकर्म करून मिष्ठान्नावर ताव मारणाऱ्या पेशवे नानासाहेबांची वार्ता ऐकून व्यथित होऊन आक्रंदन करणारे भाऊसाहेब या नाटकात दिसतात. शेवटी पानिपतच्या महासंग्रामात पराक्रमाची शर्थ करत भाऊसाहेब अफगाणी फौजेला भिडतात.

**कादंबरीतील नाट्यात्मकता आणि नाटकातील प्रवेश :**

साहित्यकृतीचे प्रकारांतर होत असतांना कादंबरीतील काही प्रसंग वगळून तर काही प्रसंग तसेच्या तसे नाटकात घेण्यापेक्षा त्यात लेखकाने यथोचित बदल करणे अनुस्यूत असते. 'रणांगण' नाटकही त्याला अपवाद नाही. 'पानिपत' कादंबरीतील आशय-विषय आणि नाट्यमूल्य असलेले संघर्षमय प्रसंग निवडून अभूतपूर्व फॉर्म घेऊन अर्थनिर्णयन करणारे 'रणांगण' हे नाटक विश्वास पाटील यांनी साकार केले.

१) स्वार्थपूर्तीकरता धूर्त नजीबखान मल्हारराव होळकरांचा 'धर्मपुत्र' म्हणवून त्यांचे अभय मिळवतो, तर दुसरीकडे मराठी सेना स्नानासाठी ज्या नदीचे पाणी वापरतात, त्यात गाई कापून त्यांचे मांस नदीत टाकतो. अशा बेरकी नजीबखानला दंडीत करण्यासाठी 'पानिपत' कादंबरीत रघुनाथराव रागाने येतात; तर 'रणांगण' नाटकात दत्ताजी शिंदे व त्यांचा पुतण्या जानकोजी शिंदे

नजीबला मारण्यासाठी येतात. कादंबरीत आणि नाटकात मल्हारराव होळकर त्यांना अडवून नजीबला जीवनदान देतात.

२) युद्धात दत्ताजी शिंदे जखमी होऊन भूमीवर पडतात. 'पानिपत' कादंबरीत कुतुबशहा व नजीब त्यांच्याजवळ जाऊन विचारतात "क्यूं दत्ताजी, लड़ेंगे?" तेव्हा रणमर्दाला साजेशे तडफदार प्रत्युत्तर दत्ताजी देतात. "बचेंगे तो और भी लड़ेंगे।" चवताळलेला कुतुबशहा दत्ताजींच्या उरावर बसून त्यांच्या छातीत खसाखस सुरा खुपसत राहतो. नजीब त्यांचे मस्तक तोडतो, कादंबरीत "मीच दत्ताजींची कत्तल केली." म्हणून मग्रुरीने सांगणाऱ्या त्या कुतुबशहाचा वध करून जानकोजी शिंदे आपल्या काकाचा प्रतिशोध घेतो. नाटकात नजीबखान दत्ताजींना मारतो असे दाखवण्यात आले आहे.

३) 'पानिपत' कादंबरीत वर्णन केल्याप्रमाणे १० जानेवारी १७६० रोजी झालेल्या युद्धात दत्ताजी शिंदेना वीरगती प्राप्त होते. येथेच पानिपतच्या युद्धाची ठिणगी पेटली. नाटकांत त्या प्रसंगी नजीब आपल्या संवादात 'आज संक्रांत' असल्याचा उल्लेख करतो. मकर संक्रांत १४ अथवा लीप वर्षात १५ जानेवारी या दिनांकाना येते. दत्ताजी शिंदेच्या निधनानंतर एका वर्षाने १४ जानेवारी १७६१ पानिपतवर झालेल्या युद्धाच्या दिवशी मकर संक्रांत होती.

४) 'पानिपत' कादंबरीत लेखकाने समरपुरंदर सदाशिवराव भाऊचे विविध पैलू रेखाटले आहेत. "दौलतीसाठी जान कुर्बान करण्याची आमची तयारी असूनही आमच्यावर फारसा कुणाचा विश्वास नाही. हा परकेपणा, उपरेपणा आम्हाला अनेक वेळा बोचला, टाचला आहे." कादंबरीत असे नाना पुरंदरेंकडे आपल्या मनातील शल्य व्यक्त करणारे भाऊसाहेब नाटकात दिसत नाहीत. तर नाट्यकृतीतील भाऊसाहेब करारी आहेत. नाटकात राघोबादादांनी बोरूबहादूर म्हणून डिवचल्यानंतर ते संतापून उठतात. "मिष्टान्नासाठी अन्नछत्रात पत्रावळ्या धुंडाळणारा मी कोणी भटभिक्षुक नव्हे" असे ठणकावून सांगतात. कादंबरीत हा संवाद ते नाना पुरंदरेकडे बोलतात. पृ. १३४, पुन्हा नानासाहेब आपल्या पत्नी गोपीकाबाईकडे हा विषय बोलतात. पृ. १३९.

५) रणांगण नाटकात भाऊसाहेब भर दरबारात रागाने पुढे होतात. हातात बोरू: लेखणी उचलतात आणि मोडून टाकतात. दरबारातील प्रत्येकाच्या नजरेला नजर भिडवत गोलाकार फिरून प्रेक्षकांकडे पाठ व श्रीमंत पेशव्यांना सामोरे होत, दोन्ही हात उंचावून "या... या या दरबाराला साक्षी मानून उत्तरमोहिमेचा विडा मी उचलतो", असा वज्रनिर्धार व्यक्त करतात. वीररसयुक्त

पार्श्वसंगीताच्या साथीने हा प्रसंग अंगावर रोमांच आणतो.

६) 'पानिपत' कादंबरीत वर्णन केलेले दिल्ली आणि कुंजपूरा विजयाचे प्रसंग, नाटकात गारदी पात्राचे निवेदन, कविवर्य मंगेश पाडगांवकर यांची चित्ताकर्शक गीतरचना, अनंत अमेबल यांचे संगीत व कोरियोग्राफर अर्चना जोगळेकर दिग्दर्शित नृत्यांतून तसेच 'शॅडो ऑन सोलोम' व 'सिल्वेट इफेक्ट' या माध्यमाने प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले जातात.

७) 'रणांगण' नाटक प्रेक्षकांना त्या स्थळ-काळात घेऊन जाते. कालवा आटून लाखो मराठ्यांना पाणी पुरवणारे स्रोत नाहीसे झाले. त्या संकटाचे भयंकर उग्ररूप, प्रकाश योजना आणि हृदयस्पर्शी पार्श्वसंगीतामुळे प्रेक्षकांना जाणवते.

८) पानिपतचा शेवटाचा महासंग्राम कादंबरीत वाचतांना अंगावर शहारे येतात. तोच प्रसंग तितक्याच ताकतीने नाटकात सादर करण्यात दिग्दर्शकाला यश प्राप्त झाले आहे. कादंबरीत जे शब्दचित्र रेखाटले जाते, ते नाटकात रंगभूमीवर प्रत्यक्ष दिसते. नेहमीच्या नाटकी लढाईपेक्षा हे महायुद्ध मोठ्या कौशल्याने सादर केले आहे. जिंकू किंवा मरू, याच निर्धाराने गंभीर मुद्रेने पात्रांचा रंगभूमीवर शिस्तबध्द प्रवेश, मध्यभागी डौलाने फडकणारा भगवा ध्वज, प्लॅटफॉर्मचा उत्तम वापर, 'हर हर महादेव, जय भवानी' ही मराठ्यांची रणगर्जना कादंबरीत वाचण्यापेक्षा नाटकात प्रत्यक्ष ऐकल्याने प्रेक्षकांचे रक्त सळसळून उठते. वीरश्रीचे आवाहन करणाऱ्या पार्श्वसंगीताच्या तालावर ताल धरत भीषण संग्रामाला आरंभ होतो. त्या हलकल्लोळात विश्वासराव पडतात. भाऊही शत्रूशी अखेरची झुंज देत पराक्रमाची पराकाष्टा करतात. रंगभूमी रणभूमी बनते. तेव्हा प्रेक्षक श्वास रोखून हा थरार अनुभवतात.

**'रणांगण' नाटकातील नवनिर्मित 'प्रवेश' :**

नाटक हे दुक्श्राव्य माध्यम असल्याने अनेक गोष्टी संवादातून न सांगताही प्रेक्षक समजतात. प्रयोग सादरीकरणाची कालमर्यादा लक्षात घेऊन नाटककाराला आपल्या नाट्यसंहितेत समयोचित बदल घडवून आणावे लागतात. त्यामुळे 'रणांगण' नाटक रंगभूमीवर सादर करताना काही नवीन प्रवेशांची निर्मिती लेखकाने केली आहे, जे कादंबरीत नाहीत. त्याच्यात गैर काही नाही. माध्यमांतरात हे स्वीकृत आहे.

१) 'रणांगण' नाटकात लेखकाने वर्तमानाचे नाते इतिहासाशी जोडले आहे. मराठ्यांच्या दिल्ली विजयानंतर दिल्लीच्या तख्तावर मराठीच राजा बसायला हवा, असा आग्रह जेव्हा मल्हारराव होळकर, जानकोजी शिंदे यांच्या बरोबर

विश्वासरावही करतात तेव्हा त्यांच्यासमोर भाऊसाहेब शिंदे-होळकर यांच्या कारभाऱ्यांनी दीड लाख नगद मोहरांना दिल्ली विकल्याचे षडयंत्र उघड करतात त्या प्रसंगी उच्चारलेला भाऊसाहेबांच्या मुखातील संवाद वर्तमानाशी नातं दर्शवणारा आहे. ते म्हणतात, "इकडे भ्रष्टाचाराच्या मार्गाने पैसा गोळा करायचा आणि तिकडे परमुलूखात नेऊन तो वाढवायचा, हा हिंदुस्थानी माणसाचा छंद जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत देशाची लक्तरं जगाच्या वेशीवर ही अशीच लोंबकळत राहणार." हा प्रसंग कादंबरीत नाही.

२) श्रीमंत सदाशिवराव भाऊ कुंजपूराच्या विजय समारोहात सर्व सरदारांचा सन्मान करतात. कादंबरीत इब्राहीम गारदीचा गजराज हत्ती देऊन गौरव करतात. नाटकातही इतरांपेक्षा त्याचा विशेष सन्मान होतो. याच प्रवेशात इब्राहीम गारदीच्या सूचनेवरून गनिमीकाव्याऐवजी युद्धाची गोलाकार व्यूहरचना ठरते; जे काहींना आवडत नाही. त्यात मल्हारराव होळकर अग्रेसर असतात. अब्दालीसारखा भयंकर शत्रू समोर युद्धासाठी उभा असताना सर्वांना सोडून माघारी जाण्याचा विचार होळकर बोलून दाखवतात. त्यावेळी भाऊसाहेबांची पत्नी पार्वतीबाई त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देताना म्हणते, "आपल्या एका उलट्या पावलाचा परिणाम म्हणून मराठा स्त्रियांची कपाळं पांढरी होतील. आपल्या लेकीसुना सासरच्या सावलीत नव्हे, तर दुष्मनाच्या मिठीत मिटून जातील." हा प्रसंग कादंबरीत नाही.

३) अवधचा नवाब शुजा उद दौला याला नजीब अब्दालीच्या बाजूने वळवतो. इस्लामच्या नावाखाली इब्राहीम गारदीवर तसाच असफल प्रयोग केला जातो. नाटकांत इब्राहीम गारदीला आपल्या खेम्या आणण्यासाठी अब्दाली नजीबला सांगतो. तो ते टाळतो. तो शेवटी अफगाण-कंदहारचा बादशहा आपल्या बेगमला इब्राहीम गारदीकडे पाठवतो. हा प्रसंग रणांगण नाटकात काल्पनिक व अनावश्यक वाटतो.

**पानिपत : कथाशयाचे मालिकेत आणि चित्रपटात माध्यमांतर :**

विद्यमान युगात तंत्रज्ञानामुळे मुद्रित मध्यामाबरोबर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट आणि सेलफोन, इंटरनेटमुळे वेब सिरीज, लघुचित्रपट तथा इतर अत्याधुनिक दृक्श्राव्य माध्यमांची निर्मिती झाली. कालानुक्रमे ही माध्यमे लोकप्रिय ठरत असली तरी त्यांना आवश्यक असणाऱ्या कथासूत्राचा स्त्रोत कलामूल्य असलेल्या साहित्यामधून प्राप्त होतो. यासाठी माध्यमांतर प्रक्रिया उपयुक्त

ठरते. 'साहित्यकृतीतील मूळ गाभा सुरक्षित ठेवून कथाशयाचे तंत्रज्ञानाधारे यंत्राधिष्ठित माध्यमानुरूप होणारे नवसर्जन म्हणजे माध्यमांतर.' प्रस्तुत माध्यमांकरता बहुतांशी तयार असलेल्या साहित्यातील कथाशयाचे उपयोजन मोठ्या प्रमाणात केले जात आहे. साहित्यकृतीतील विषय हा दूरदर्शन मालिका तथा चित्रपटांच्या माध्यमातून प्रस्तुत केल्याने अधिकांश प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संभावना असते. पानिपत युद्धाच्या कथाशयाचे 'द ग्रेट मराठा' या दूरदर्शनच्या हिंदी मालिकेत आणि 'पानिपत' या हिंदी चित्रपटात माध्यमांतर झाले आहे.

साहित्य निर्मितीसाठी साहित्यिक तर माध्यमांच्या कलाकृतीसाठी दिग्दर्शक महत्त्वाचा. माध्यमाच्या मर्यादा आणि बलस्थाने लक्षात ठेवूनच माध्यमांतर करणे त्याला अनिवार्य ठरते. ऐतिहासिक कलाकृतीच्या निर्मिती प्रक्रियेत तो अधिक सजग असणे आवश्यक असते. पटकथा लेखनात मूळ गाभा सांभाळत प्रधान्यक्रमानुरूप कथाशयातील प्रसंग-पात्रे स्वीकारणे, स्वकल्पनेने त्यात भर घालणे, काही विषय टाळणे, पात्रासाठी योग्य कलाकार तसेच चित्रीकरणासाठी स्थळ, काळाची निवड करणे हे सर्व दिग्दर्शक ठरवतो. आशुतोष गोवारीकर यांनी दिग्दर्शित केलेला 'पानिपत' हा हिंदी चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला.

**'पानिपत' चित्रपट : माध्यमांतरित नवनिर्मिती :**

'पानिपत' हा चित्रपट त्र्यंबक शेजवलकरांच्या पानिपत या ग्रंथावर आधारलेला आहे. असा उल्लेख विकिपीडियावर आहे.[५] एका मुलाखतीत विश्वास पाटील यांनी चित्रपटाविषयी आपले मत मांडले आहे.[६] 'पानिपत' ही मूळ ऐतिहासिक कथाशयाची चित्रपटात मध्यामांतरित झालेली नवनिर्मिती आहे. सदाशिवराव भाऊची पत्नी पार्वतीबाई चित्रपटाच्या कथासूत्राचे निवेदन करते. त्यामुळे मूळ कथाशयातील प्रसंगांचे कथन, तिच्या निवेदनातून होते; तर काही प्रसंग चित्रिकरणाद्वारे साकार केले गेले. उत्तर भारतात यमुना नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर मराठ्याची सेना आणि अब्दालीची फौज यांचा होणारा प्रवास आणि शेवटी उभय पक्षीय सेना एकमेकांच्या विरुद्ध दिशेने परस्परांचे मार्ग रोखून कशी उभी राहिली हे सर्व ग्राफिक्सच्या माध्यमाने चित्रपटात उत्तमरीत्या दर्शवल्याने प्रेक्षकांना त्या परिस्थितीचे आकलन करणे सुलभ होते.

यमुना ओलांडून अब्दालीने मराठ्यांच्या सैन्याचा पाठलाग केला. पानिपतच्या उत्तरेकडे असलेल्या मराठ्यांचा मार्ग दक्षिणेकडे होता आणि अब्दालीचा मार्ग उत्तरेकडे होता. त्यामुळे पानिपतच्या दक्षिणेकडून येणाऱ्या अब्दालीने मराठ्यांचा

दक्षिणेकडे जाण्याचा मार्ग अडवला. इतकेच नव्हे तर त्याने मराठ्यांना दक्षिणेतून मिळणारा रसद पुरवठा आणि पुण्यातील संपर्क तोडल्यामुळे त्यांच्या प्रचंड सैन्याची उपासमार होते. मराठ्यांनीसुद्धा अब्दालीचा उत्तरेचा मार्ग रोखला आणि त्याचा काबूलशी संपर्क तोडला. सदाशिवराव भाऊची मराठी सेना आणि अब्दालीची अफगाणी फौज एकमेकांचा रस्ता अडवून उभी होती. त्यामुळे दोघांसमोर संधी अथवा युद्ध असे दोनच पर्याय उपलब्ध होते, 'भारतकोशा'मध्ये या युद्धाची दोन कारणे दिली आहेत. "पहला, नादिरशाह की तरह अहमदशाह अब्दाली भी भारत को लूटना चाहता था। दूसरा, मराठे 'हिन्दूपद पादशाही' की भावना से ओतप्रोत होकर दिल्ली को अपने अधिकार में लेना चाहता था।"[७] हिंदुस्थानात लूट करण्यासाठी आलेल्या अब्दालीला हे युद्ध फायद्याचे नसल्याचे लक्षात आले होते कारण त्याला दिल्ली आणि कुंजपुरा जिंकणाऱ्या मराठ्यांच्या सामर्थ्याचा अंदाज आला होता. म्हणून त्याने संधी करायचा प्रयत्न केला, परंतु नजीबने ती होऊ दिली नाही. शेवटी उभय पक्षांकडून निर्णायक युद्धाला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला जातो.

**'पानिपत' चित्रपट निरीक्षणे :**

१) चित्रपटाचा पूर्वार्ध सदाशिवराव भाऊ आणि पार्वतीबाई यांच्या अनावश्यक प्रेम कहाणीवर अधिक केंद्रित झाला आहे.

२) उदगीर युद्धाआधी सदाशिवराव भाऊचा विवाह झाला होता. चित्रपटात युद्धानंतर सदाशिवराव भाऊ आणि पार्वतीबाई यांची प्रेम कहाणी आणि विवाह दाखवला आहे.

३) उदगीर विजयोत्सवात दत्ताजी दाखवले आहे. ते त्याच काळात उत्तरेत वीरगतीला प्राप्त झाले होते.

४) चित्रपटाचा चरित्रनायक सदाशिवराव भाऊची भूमिका साकारण्यासाठी योग्य सक्षम कलाकारांची निवड व्हायला हवी होती.

५) 'बचेंगे तो और लड़ेंगे' असे कुतुबशाहाला सांगणाऱ्या दत्ताजींचे शीर कापून कुतुबशाहने ते फौजेत मिरविले.[८] दत्ताजी शिंदे यांच्या हौतात्म्याचा प्रतिशोध घेण्यासाठी मराठे उत्तरेत गेले. त्यांनी कुंजपुरा जिंकून कुतुबशाहाला तेथे पकडले. तेव्हा कुतुबशाहाचे मस्तक कापून, भाल्यावर खोचून मराठी फौजेत मिरविण्याचा आदेश दिला. जनकोजीने दत्ताजींच्या अपमानाचा प्रतिशोध घेतला.[९] चित्रपटात अशा ऐतिहासिक घटना-प्रसंगाना प्राधान्य देण्यापेक्षा

प्रेमकथेत वेळ दवडल्याचे जाणवते.

६) छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा उल्लेख मराठा साम्राज्य म्हणून होताना दिसतो.

७) 'पाणिपतच्या बखरीत' केलेल्या वर्णनानुसार तहासाठी आलेल्या इराणीच्या वकिलाला भाऊसाहेबांनी 'हिंदुपत बादशाही येथील बंदोबस्त करणे, तो आम्हीच करू.' (पृ. १७) असे प्रत्युत्तर निर्भयपणे दिले होते. पानिपत चित्रपटात दाखवल्याप्रमाणे तह करण्यासाठी अब्दाली आणि भाऊसाहेब समोरासमोर येणे संभवनीय वाटत नाही.

**समारोप :**

राष्ट्रदेवतेला रक्ताचे अर्घ्य अर्पण करणाऱ्या मर्द मराठ्यांच्या देदीप्यमान पराक्रमाचा ज्वलंत इतिहास म्हणजे पानिपतचा रणसंग्राम.

पानिपतच्या या ऐतिहासिक प्रसंगावर आधारित बखर वाङ्मय, कादंबरी, नाटक, दूरदर्शन मालिका आणि चित्रपट निर्माण झालेत. यात पानिपत युद्धाचा समान गाभा असलेल्या कथाशयाच्या आविष्कारामध्ये साहित्यप्रकार आणि माध्यम यांच्या प्रकृतीनुसार वेगळेपणा जाणवतो हे निर्विवादपणे स्वीकारावे लागते.

**निष्कर्ष :**

१) हिंदुस्थानात पानिपतच्या पहिल्या युद्धापासून मोगल सत्तेला आरंभ झाला आणि पानिपतच्या तिसऱ्या युद्धापासून मोगल सत्तेच्या लयाला आरंभ झाला.

२) १० जानेवारी १७६० रोजी दत्ताजी शिंदेच्या वीरमरणाने सुरू झालेला मराठे आणि अब्दाली यांच्या संघर्षाचा शेवट एका वर्षाने १४ जानेवारी १७६१ या दिवशी पानिपतवर झालेल्या युद्धात झाला.

३) पानिपतचा रणसंग्राम हा दारुण पराभवाचा नव्हे, तर मराठ्यांच्या त्यागाचा, बलिदानाचा, त्यांच्या प्रचंड धैर्याचा, शौर्य-पुरुषार्थ आणि पराक्रमाचा तेजस्वी इतिहास आहे.

४) पानिपतचे युद्ध या समान विषयावर आधारित "पाणिपतची बखर, भाऊसाहेबांची बखर भाऊसाहेबांची कैफियत, होळकरांची थैली, नाना फडणीसांचे आत्मचरित्र" या सर्व बखर वाङ्मयात काही अंशी भेद दिसून येतात.

५) पानिपतचा इतिहास विश्वासराव पाटलांनी आपल्या 'पानिपत' या कादंबरीत सप्रमाण मांडला. त्याच कथाबीजाचे 'रणांगण' नाटकात प्रकारांतर करून

त्याचा प्रयोग मराठी रंगभूमीवर यशस्वीरीत्या सादर केला.

६) चित्रपट हे मनोरंजनाचे तसेच प्रबोधनाचेही अत्यंत आकर्षक माध्यम आहे. त्यात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली ऐतिहासिकतेला बाधक ठरणारी कृती टाळता येणे शक्य आहे. 'पानिपत' चित्रपटात प्रेमकथा चित्रणापेक्षा महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंगांना अधिक प्राधान्य देणे आवश्यक होते.

७) समाजाचे प्रतिबिंब साहित्यात तसेच चित्रपटात दिसून येते, तद्वत साहित्य तथा चित्रपट यांचाही प्रभाव समाजावर होत असतो. हे स्मरणात ठेऊन राष्ट्राला गौरवान्वित करणाऱ्या साहित्याची आणि चित्रपटांची निर्मिती व्हायला हवी.

**संदर्भः**


१) सरदेसाई, माया, भारतीय रंगभूमीची परंपरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९६.

२) पाणिपतची बखर संपादक डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी, प्रकाशकः वि. गं. कुलकर्णी, पुणे २. १९७१

३) शहा विभा, मराठी ऐतिहासिक कादंबरी, एक अभ्यास, मेहता प्रकाशन, पुणे. १९९८

४) पाणिपतची बखर, उनी

५) https://mr.wikipedia.org/wiki/ त्र्यंबक शंकर शेजवलकर

६) https://www.youtube.com/watch?v=HSuOdDInBGQ

७) https://bharatdiscovery.org/india/ भारतकोश, ज्ञान का हिंदी महासागर

८) https://mr.wikipedia.org/wiki/ दत्ताजी शिंदे

९) Meheta L. J., Advanced study in the history of Modern India 1707-1813, New Dawn Press, INC 2007, pg.277


**आधार ग्रंथ आणि साधने :**


१) पाटील विश्वास, पानिपत, राजहंस प्रकाशन, पुणे

२) पाटील विश्वास, रणांगण, मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे

३) https://www.youtube.com/watch?v=IYON9jNVawU(रणांगण नाटक)

४) 'पानिपत' चित्रपट (हिंदी) २०१९

५) 'द ग्रेट मराठा' दूरदर्शन मालिका (हिंदी) १९९४.


■